
पिराजी पलटणवाला



पिलाजी पलटणवाला

प्रा. वि. पां. बोकील, एम्. ए., एस्. टी. सी. डी.
सेवानिवृत्त एज्युकेशनल इन्स्पेक्टर, पुणें.

आणि

श्री. ल. रं. रड्डी, बी. ए., बी. टी.
सेवानिवृत्त ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, ठाणे.

किंमत] [आठ आणे.

प्रकाशक—

श्री. ल. रं. रड्डी, बी. ए., बी. टी.

वर्मा यांचा बंगला, पुणें ४.

प्रथमावृत्ति

८ फेब्रुवारी १९५३

मुद्रक—

श्री. गंगाधर शंकर दाते, कलागृह छापखाना,

६६६ सदाशिव, पुणें २.

प्रस्तावना

आपल्या समाजांत सामान्यतः लष्करी पेशाचा मनुष्य कसा वागतो त्याचे स्वभाव चित्र या लहानशा गोष्टीत रेखाटलेले आहे. पलटणवाल्यास असे वाटते की आपण इतर माणसाहून निराळे आहोत, आपणास काही विशेष हक्क आहेत, आपण करू ते होईल, आपण मागू ते मिळेल. यावरून त्याचा अहंकार वाढत जातो. अर्थातच या कोत्या समजुतीमुळे काही माणसाशी त्याचे खटके उडतात. अन्यायाने कोणालाहि सर्वांशी व सर्वदा वागता येत नाहीं. या न्यायाने तो पलटणवाला केव्हा तरी संकटात पडतो. मग त्याचे डोळे उघडतात. अशा वेळी त्याला चांगला मार्गदर्शक जर मिळाला तर समाजात कसे विचाराने व सौजन्याने वागावे लागते त्याची समजूत त्याला पटते. त्यामुळे खरा नागरिक तो होऊ शकतो.

या गोष्टीत कोणाहि व्यक्तीवर टीका केलेली नाही. सर्व नावे काल्पनिक आहेत. सामाजिक जीवनात ज्या गुणांचा उपयोग होतो, त्यांचे वर्णन या गोष्टीत केलेले आहे.

पुणे.
रामदास नवमी, शके १८७४

लेखक.

पिलाजी पलटणवाला

१

कोरेगाव स्टेशनावर मोठी गर्दी जमली. गावाचे पुढारी तेथे आले. शाळेचे शिक्षक व मुले तेथे आली. ढोल, वाजंत्री व लेझीम वाजविणारे आपल्या तयारीने जमले. लेझीम वाजविणारी शाळेतील मुलेच होती. त्यांची लेझीम पाहण्यास आसपासचे लोक यावयाचे. अगदी ठेक्यात त्यांची लेझीम होई. त्याबद्दल त्याना अनेक समारंभात बक्षिसे मिळाली होती. अब्दागीर व तोरणमाळा घेऊन लोक आले होते. साडे अकरा वाजता पुण्याकडून गाडी यावयाची. तिची वाट सारे लोक पहात होते.

म्हातारे रामराव बर्गे खुर्चीवर बसले होते. त्यांच्या भोवती पुढारी मंडळी उभी होती. गाडीला उशीर होणार अशी काळजी रामरावाना वाटू लागली. "अजून गाडीची घंटा का होत नाही?" असे त्यानी विचारले. त्यावर पाटील म्हणाले– "दाजीबा, अजून साडे अकरा वाजले नाहीत; थोडा अवकाश आहे." रामराव बोलले– "केव्हा एकदा पोराला पाहीन असे मला झाले आहे." लगेच त्यांच्या डोळ्याना पाणी आले व त्यांचा कंठ दाटून आला. त्यांचा मुलगा पिलाजी पलटणीत

जमादार झाला होता. रजा घेऊन तो आज या गाडीने घरी येणार असे पत्र आले होते. त्याला भेटण्यासाठी ही सारी मंडळी स्टेशनावर जमली होती.

इतक्यात गाडी आली. लष्करी पोषाखात पिलाजी डब्याच्या दाराशी उभा होता. त्याने हात वर केला. त्याला साऱ्यानी ओळखले " पिलाजीराव की जय; पिलाजीराव की जय " असा घोष मुलानी केला. त्याला कवटाळण्यास रामराव धावू लागले. पाटील व शिक्षक यानी त्याना धरले व म्हटले— " दाजीबा गाडी थांबू द्या; तुमचा पिलाजी आलाच आहे. " इतक्यात गाडी थांबली. पिलाजी खाली उतरला व रामरावाच्या पाया पडला. " माझा पिलू " असे म्हणून त्या म्हाताऱ्याने त्याला पोटाशी कवटाळले. बापलेकांची ती प्रेमाची भेट लोक पहातच राहिले. दोघेहि गहिवरले. दोघांच्या डोळ्याना पाणी आले.

थोड्या वेळाने सर्व मंडळी गावाकडे निघाली. मोटारीत रामराव, पिलाजी, वगैरे मंडळी बसली. मग पिलाजीचे सात मित्र बाहेरच्या पायरीवर उभे राहिले. ढोल, वाजंत्री, लेझीम वाजू लागले. मोटारीवर अब्दागीर व तोरणमाळा फडकू लागल्या. मिरवणूक अशा थाटाने निघाली. चालता चालता पिलाजीचे दोन मित्र मोटारीच्या पायरीवरून खाली पडले. त्याना फारसे लागले नाही. वेशीत आल्यावर " कोणीकडे

जावयाचे " असे वाजंत्रीवाल्यानी विचारले. पाटील म्हणाले– " चला तालमीकडे. " इतर काही लोक बोलले–" चला देवळाकडे ". मग गुरुजींनी सांगितले " पिलाजीला आता थोडा विसावा घरी घेऊ द्या. त्याला आंघोळ, जेवण करू द्या. संध्याकाळी देवळात सभा करा. " हे म्हणणे सर्वांना पटले. पिलाजीच्या घराजवळ मिरवणूक थांबली.

पिलाजीची आई भाकरी व पाणी घेऊन दारापाशी उभी होती. पिलाजीवरून तिने भाकरी ओवाळून टाकली. पिलाजीने चूळ भरली व आईच्या पायावर डोके ठेवले. तिने त्याला प्रेमाने कवटाळले. पिलाजीला पाहून घरात सर्वांना मोठा आनंद झाला. त्याची लहान भावंडे त्याला बिलगली. वाघ्या कुत्रा तर त्याच्या मांडीवर पुढले पाय ठेवून त्याचा पट्टा ओढू लागला. गोठ्यातील बैल डरकाळू लागले. हे सर्व माजघराच्या दारामागून पिलजीची बायको पहात होती. घरातला मोठा मुलगा पलटणवाला झाला. दिवाळीच्या सुट्टीला तो घरी आला. म्हणजे आनंदी आनंद.

२

पिलाजीच्या बरोबर जेवायला त्याचे दोन तीन मित्र होते. त्या समारंभावरून पिलाजीला कळून आले की " आपण बडे सुभेदार झालो. साऱ्या गावात आपण मोठे. मोठेपणानेच आपण सर्वांशी वागले पाहिजे." आपल्या मित्राशी सुद्धा बोलताना तो मोठेपणा दाखवू लागला. प्रथम त्यानी ते थट्टेवारी घेतले. जेवणानंतर आणखी दोन तीन मित्र जमले. ते सर्वजण पडवीत बसले. जागा लहान होती. सर्वांना अडचण वाटली.

मित्रांच्या पुष्कळ गप्पा झाल्या. गावातली माहिती त्यानी पिलाजीला सांगितली. त्याने लष्करातील अनुभव मित्राना सांगितले. " आमच्यावर साहेबाची मर्जी आहे " असे तो वरचेवर बोलला. " तुम्ही काय आळशी लोक ! गावात रिकामटेकडे कशाला बसता ? चला पलटणीत " असा उपदेश तो त्याना करू लागला. बराच वेळ गप्पा झाल्यावर पिलाजीने पत्त्याचा डाव काढला. " चला, आपण ' रमी ' खेळू "— असे तो म्हणाला. मित्र म्हणाले—" रमी आपणाला येत नाही; आपण लाडीस खेळू " पिलाजी बोलला—" तुम्ही गांवढळ ! " मग लाडीस खेळण्यास सहा जण बसले.

खेळात एकदोनदा पिलाजीला चांगला डाव आला. त्यामुळे तो चढला, ऐटीने बोलू लागला. नंतर दुसऱ्या बाजूला चांगला डाव मिळाला. त्यामुळे पिलाजी खट्टू झाला. एकदा त्याने खोटेपणाने हुकूम मारला व डाव जिंकला. पण त्याच्या चुलत भावाने त्याची लबाडी उघडकीस आणली. मग पिलाजी चिडला. बरीच बाचाबाची झाली. सर्वांना दाबून टाकण्यासाठी पिलाजी मोठ्याने ओरडला. रामराव मध्ये पडले— "अरे पोरानो, खेळात काय भांडावे! गुण्यागोविंदाने खेळावे."

संध्याकाळी मित्राबरोबर पिलाजी सिनेमाला निघाला. तिकिटाच्या दाराशी मोठी रांग होती. पिलाजीने एका मित्राजवळ पैसे दिले व तिकिटे काढण्यास सांगितले! तो मित्र रांगेत शेवटी उभा राहिला. बराच वेळ तिकिटे मिळेनात. पिलाजी रागावला. त्याने मित्राजवळचे पैसे घेतले. खिडकीजवळ तो गेला. पहिल्या माणसाला त्याने मागे ढकलले आणि तिकिटे काढली. त्याच्या लष्करी रुबाबाने माणसे चपापली. "आम्ही आज गावात आलो! आम्हाला आधी जागा नको का?" असे म्हणत पिलाजीने तिकिटे घेतली.

रात्री बहिरोबाच्या देवळात सभा भरली. एक हजार माणसे जमली. बहुतेक सर्व पुरुषच होते. पिलाजी एकटा खुर्चीवर बसला. प्रसिद्ध भोसले वकील प्रथम बोलले—"आपल्या

गावाची कीर्ति पिलाजीरावानी वाढविली. आपल्या पराक्रमाने ते लवकरच वरच्या जागी चढतील व सेनापति होतील. मग गावाला काय कमी पडेल....." पिलाजीचे एक दोन मित्र बोलण्यास उठले; पण " पिलाजी...आमचा शिवाजी... लढाई करील...गनीमाला मारील " असे तुटके त्यांचे काही शब्द लोकाना ऐकू आले.

पिलाजीला चावडी, तालीम व शाळा यांच्या तर्फे हार मुलानी घातले. काही मुले ओरडली " शिवाजी महाराज की जय." " पिलाजीराव की जय. " मग पिलाजी बोलण्यास उठला. " तुम्ही आम्हाला खुर्चीवर बसविले. चांगले केले. पलटणवाला शूर पाहिजे. शिवाजीची आठवण ठेवा. आम्ही तलवार धरतो, बंदूक उडवतो. आमच्यावर साहेबाची फार मर्जी. आम्हाला सारे लोक भितात. आम्हाला पाहिजे ते सरकार देतो...पाहिजे ते आम्हाला मिळते. "

शेवटी शाळेतल्या मुलानी " वंदे मातरम् " पद म्हटले. आणि सभा संपली. पिलाजीला वाटले " आपण बडे सुभेदार झालो, हवे ते मिळवू. "

३

कोरेगावात बर्गे यांचा भाऊपणा मोठा होता. त्यांची सवाशे घरे होती. सर्वांना जमिनी थोड्या थोड्या होत्या. पाटीलकी त्यांच्या घराण्यात होती. वाटण्या झाल्यामुळे चार घरात पाळीपाळीने पाटिलकी येत असे. पिलाजीच्या घरात पाटिलकी नव्हती. त्याच्या शेजारच्या बाळाजीच्या घरात पाटिलकी चालू होती. पिलाजीला एवढा मान लोकानी दिला. हे पाटलाच्या मुलास लागले. त्याच्या मनात पिलाजीबद्दल राग उत्पन्न झाला. " पलटणवाल्याचा एवढा मान कशाला ! आम्ही कमी आहो काय ? " असे ते बोलू लागले.


पिलाजीचे घर लहान होते. त्याचे मित्र आले म्हणजे अडचण होत असे. बोलत बसायला. खेळत बसायला चांगली जागा नव्हती. शेजारी भाऊपण्याची पुष्कळ मोकळी जागा होती. त्यावर चार खणाचा मांडव घालावा असे पिलाजीच्या मनात आले. त्याच्या मित्राना ते आवडले. लगेच त्यानी रानातून मेढी आणल्या, झाडांच्या फांद्या जमविल्या, कडब्याच्या पेंढ्या वर अंथरल्या; एका दिवसात तो मांडव तयार झाला.

शेजारच्या भाऊबंदानी तक्रार केली—“ आमच्या जागेवर तुम्ही मांडव घालू नका. ” रामराव पिलाजीला म्हणाले— “ पिलू, हे भांडण उकरून काढू नको. शेजाऱ्याशी वैर करू नको. ” पण पिलाजी जोरात होता. तो उसळून बोलला— “ ही जागा माझीच आहे. कोण येतो माझा हात धरायला ! त्याचा समाचार घेण्याला हे माझे दंड तयार आहेत. ” असे म्हणून त्याने दंड थोपटले. रामराव बोलले — “ हे चांगले नव्हे, बाबा. अशी दांडगाई करू नये. ” शेजारी पुष्कळ रागावले व बोलले.

त्या मांडवात पिलाजी व त्याचे मित्र बसू लागले, खेळू लागले. पत्ते, सोंगट्या खेळत ते रात्रभर बसत आणि थोडा वेळ तेथेच झोपत. दिवसा सुद्धा त्यांचे खेळ चालत. खेळात कधी कधी बाचाबाची होई. पिलाजी जोरात असे. त्याचे काही मित्र पड खात असत. एकदा दुपारी त्यांचा खेळ चालला होता. पिलाजीला तहान लागली. त्याने आपल्या बहिणीला पाणी आणण्यास सांगितले. पिण्याचे पाणी संपले होते. पिलाजीची बायको घागर घेऊन बाहेरच्या आडावर गेली.

बराच वेळ झाला तरी पाणी कोणी आणीना. पिलाजी रागवला, उठून घरात गेला. त्याची आई म्हणाली— “ जरा थांब. सूनबाई आडावर गेली आहे. ” पिलाजीला थांबवेना. तो तसाच आडाकडे गेला. तेथे पाच सहा बायका होत्या.

त्या पाळीपाळीने पाणी ओढीत होत्या. पिलाजीची बायको मागे उभी होती. पिलाजी ओरडला— "आडावर सुद्धा रांग कशाला! आम्हाला पाणी आधी पाहिजे." त्याला पाहून साऱ्या बायका पळून गेल्या. पिलाजीच्या बायकोने पाणी काढले.



पिलाजीची ही वागणूक लोकाना आवडली नाही. ते आपसात तक्रार करू लागले. पिलाजीचे मित्र कावरेबावरे झाले. त्याची आई सुद्धा बोलली—" असे रागावू नये, बाबा. जरा दमाने घ्यावे. बायकांच्या पुढे जाऊ नये." त्यावर पिलाजी ओरडला—" आम्हाला पिण्यास पाणी नको का? चार

वर्षांतून एका दिवाळीला आम्ही घरी आलो; तर गावकऱ्यानी आम्हाला आधी पाणी देऊ नये ! ”

ही गोष्ट रामरावाच्या कानावर रात्री गेली. त्याना फार वाईट वाटले. आपल्या मुलाने असा उतावळेपणा करावा, आणि शेजारच्या बायकांच्या पुढे जाऊन ओरडावे—ही मोठी चूक झाली असे त्याना वाटले. त्यानी पिलाजीला सांगितले— “ पिलू, तुझे चुकते. असा उतावळेपणा व माजुरीपणा करू नको. आणि शेजाऱ्यांच्या पुढे असा दांडगेपणा करू नको. याचा परिणाम वाईट होईल. ” पिलाजीच्या मित्राना त्यानी सांगितले की पिलूला समजावून सांगा.

४

पिलाजी पलटणवाला साऱ्या कोरेगावात सर्वांच्या बोलण्यात येऊ लागला. प्रथम त्याला लोक नावाजीत असत. तरुण मुलानी पलटणीत जावे, नाव करावे असे ते म्हणत. लहान मुले तर " शिवाजी " " तानाजी " व " पिलाजी " ही नावे जोडीने बोलू लागली. हातात काटक्या घेऊन " शिवाजी " " तानाजी " " पिलाजी " या नावाने ढालतलवार खेळण्यास त्यानी सुरवात केली. पण पुढे " पिलाजी माजुरी "—" तो बायकांच्या अंगावर ओरडतो " अशी लोकांची बोलणी ऐकू येऊ लागली. लहान गावात असली बोलणी एकाकडून दुसऱ्याला भराभर कळली.


पिलाजी लहानपणी तालमीत जात असे. तो कुस्ती तडफेने करी. त्याचे मित्र त्याला पाडव्याच्या दिवशी तालमीकडे नेऊ लागले. एक माळीण केळाची पाटी डोक्यावर घेऊन पुढे चालली होती. पिलाजीने तिच्या पाटीतली मोठी फणी उचलली. माळणीला ते समजले. मागे वळून तिने विचारले —" हे काय हो, दादा ? आपल्या हातानेच फणी उचलता ?" त्यावर पिलाजी म्हणाला " मग काय झाले ! चोरून नेली नाही ना? तालमीतून परत आलो की तुझे पैसे देऊन टाकीन."

माळीण गरिबीने बोलली "बरे, सुभेदार दादा, मागून पैसे द्या. १४ केळी आहेत, बघून घ्या; सात आणे द्या. तुमचे घर मला आहे ठाऊक. दुपारी येईन मी तिकडे."

वाटेने जाता जाता त्या तरुणानी ती केळी खाऊन टाकली. हसत खेळत ते तालमीकडे गेले. तालमीतल्या साऱ्या तरुणानी —"या पिलाजीराव" असे म्हणून त्याचे स्वागत केले. तेथील हौदा लहानच होता. त्याच्या कडा पडल्या होत्या. माती साधारण पांढुरकी होती. मारुतीची तसबीर फुटकी होती. तीन चार विटांचे व दगडांचे जोड जोरासाठी होते. दोन तीन मोठी करेली कोपऱ्यात पडली होती. "तालमीकडे कोणी बघत नाही का" असे पिलाजीने विचारले. "आता तुम्हीच बघा की!" असे उत्तर त्याला कोणी तरी दिले. त्यावर सर्वजण मोठ्याने हसले.

पिलाजीला कुस्ती खेळण्याचा सराव अलीकडे नव्हता. तरी हौद्यात तो उतरला. त्याच्या बरोबर सदू चौगुले खेळला. सदूने त्याला पाडले. मग इतर मुलांच्या कुस्त्या झाल्या. पिलाजी गप्पा मारीत बसला. त्याच्या चुलत भावाला कुस्तीसाठी मुलानी उठविले. पण पिलाजी त्याच्या बरोबर खेळण्यास तयार होईना. "तुम्ही सारे रानवट आहात. तुम्हाशी काय खेळायचे!" असे तो म्हणाला. त्यावर सारी मुले मुकाट्याने बसली.

बराच वेळ असा गेला. संध्याकाळ झाली. एक मुलगा म्हणाला—" आज सुभेदारानी मारुतीला पेढ्याचा नैवेद्य दाखविला पाहिजे. " काहीजण बोलले—" खरेच, गड्यानो, आज साऱ्याना पेढे पाहिजेत. " मग पिलाजीने लगेच एका मित्राला सांगितले—" अरे बाळा, त्या परदेशी हलवायाच्या दुकानातून एक शेर पेढे आण. साऱ्याना पेढे आम्ही आज देणारच. " बाळा म्हणाला—" आता आणतो मी पेढे तीन रुपये द्या. " पिलाजी बोलला—" अरे, माझे नाव सांग आणि पेढे आण. मी त्याला मग पैसे देईन. "



बाळा हलवायाकडे गेला. पिलाजीरावाच्या नावावर त्याने एक शेर पेढे मागितले. पण हलवाई म्हणाला– " मी पिलाजीरावाला ओळखीत नाही. रोख पैसे द्या. " बाळा परत तालमीत आला. त्याने हलवायाचे शब्द पिलाजीला सांगितले. पिलाजी संतापला. तो स्वतः हलवायाकडे गेला. त्या दोघाची बरीच बाचाबाच झाली. हलवाई म्हणाला–– " लष्करचा रुबाब येथे दाखवू नकोस. रोख पैसे टाक.— " पिलाजी खूप चरफडला आणि शेवटी परत फिरला. पेढे मिळाले नाहीतच. तो परदेशी त्याच्या दमदाटीला जुमानीना. काही लोकानी त्या दोघांची बाचाबाच ऐकली.

५

पिलाजीच्या वागणुकीबद्दल गावात बरीच वाटाघाट चालू झाली. कोणी त्याची बाजू घेत; तर कोणी उलट बाजूने बोलत. भाऊपण्याची जागा त्याने बळकावली; माळणीची केळी त्याने उचलली; आडाजवळ बायकांच्या अंगावर तो ओरडला. लोकाना हे सारे बरे वाटले नाही. पलटणवाला झाला म्हणून काय झाले! इतका बेगुमानपणा कोणालाहि शोभत नाही. गरीब माणसे त्याच्या पुढे वाकली. पण तो परदेशी ताठर मनुष्य शेरास सव्वाशेर भेटला. त्याच्या वाचून माजुरी माणसाची खोड मोडत नाही.

गुरुजींच्या कानावर या गोष्टी गेल्या. मुलाना त्यानी असे समजून सांगितले—" पिलाजी लष्करी शिस्तीत वाढलला. वरिष्ठ अधिकाऱ्याचे हुकूम पाळण्याची त्याला सवय झाली आहे. स्वतः विचार करून वागण्याची शिस्त त्याला माहित नाही. त्याला वाटते आपणास सारे हक्क आहेत. तसेच हक्क इतरानाहि आहेत—हे त्याला समजत नाही. असे जरा धक्के बसले की त्याला ते समजू लागेल. समाजात राहण्याची त्याला सवय नाही आरंभी असे व्हायचेच."

ते ऐकून काही प्रौढ मुले म्हणाली—" गुरुजी, तुम्ही त्या पिलाजीला या गोष्टी समजून सांगाव्यात. गरीब माणसाना

त्याच्या हातून अन्याय सोसावा लागतो. त्या माळणीला १४ केळाबद्दल त्याने ४ आणेच दिले. तिचे ३ आणे बुडविले. ती बिचारी रडली." गुरुजी त्यावर बोलले—"मी जर त्याला सांगायला गेलो, तर तो माझे बोलणे ऐकणार नाही. तो म्हणेल की, तुम्हाला कशाला ही उठाठेव! त्याचे डोळे उघडायला त्या परदेश्यासारखे धक्के देणारे त्याला भेटले पाहिजेत. तुम्ही सुद्धा जरा त्याजवर नजर ठेवा. प्रसंग आलाच तर त्याला बोलून पहा की."

इकडे पिलाजी व त्याचे मित्र यांच्या गप्पा चालू होत्या. त्यांचे खेळ मधुन मधून चालत असत. त्या नव्या मांडवात त्यांची बैठक असे. एके दिवशी दुपारी त्या मांडवात ते लाडीस खेळत होते. पान, तंबाकू, बिडी, सिगारेट इत्यादींचा समाचार चालू होताच. तंबाकूच्या पिचकाऱ्यानी आसपासची जमीन तांबडी झाली होती. काड्या, बिड्यांचे व सिगारेटचे तुकडे इकडे तिकडे पडले होते. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास ते सारेजण झोपले. थोड्याच वेळात त्या मांडवाचा कडबा पेटला. एकदम वाऱ्याने ज्वाळा भडकल्या. पिलाजी व त्याचे मित्र खडबडून उठले आणि गडबडीने मांडवाच्या बाहेर पळाले. चार मिनिटात सर्व मांडव जळून गेला.

बरीच गडबड झाली. पुष्कळ लोक जमले. ती मांडवाची आग लवकरच विझली. पाण्याची जरूरी लागली नाही. काही

कपडे व बैठक आगीत जळून गेली. शेजारचे भाऊबंद म्हणाले– "छान झाले ! लोकाची जागा बळकावतो नाही का ! बरी थप्पड देवाने मारली." पिलाजी म्हणाला—" हे भाऊबंद दुष्ट. त्याना आमचा मोठेपणा पाहवेना. त्यानीच मांडवाला आग लागली. " त्यावर रामराव बोलले—" असे बोलू नये, बाबा. तुमची विडी-काडी पडली असेल. उगीच शेजाऱ्यावर आळ घेऊ नये. " सहा दिवसापूर्वी उभारलेला तो मांडव अशा प्रकारे जळून गेला. गुरुजीनी येऊन चौकशी केली. रामरावाचे बोलणे त्याना पटले. निष्काजीपणाने टाकलेल्या बिडीकाडीनेच ती आग लागली असेल—असे त्याना वाटले. बाहेरचा मनुष्य दिवसा अशी आग लावणार नाही—असे ते म्हणाले.

६

पिलाजीवर त्याचे काही शेजारी व भाऊबंद रागावले होते. त्याचा तो मांडव जळून गेला म्हणून त्याना थोडे बरे वाटले. पण त्याने त्यांचे पूर्ण समाधान झाले नाही. आडाजवळ बायकांच्या अंगावर पिलाजी ओरडला होता. त्याची त्याना फार चीड आली. त्याबद्दल पिलाजीला चांगला ठोकला पाहिजे—असे चार पाच तरुणानी ठरविले. आपल्या शेतात पिलाजी संध्याकाळी जातो. तेथे त्याला ठोकावा असा बेत त्यानी केला. त्याचा दिवस व वेळ त्यानी ठरविली. सर्वांनी तोंडावरून घोंगडी घ्यावयाची; कोणी काही बोलायचे नाही; मुकाट्याने काठ्या मारायच्या; असा कट झाला.

त्या गुप्त कटाची बातमी शाळेतल्या एका मुलाला कळली. त्याने ती गुरुजीना सांगितली. गुरुजीनी दहा मोठ्या मुलाना घरी बोलाविले. त्या कटाची बातमी त्यानी त्याना सांगितली. एक मुलगा म्हणाला—“ मी पिलाजीला हे सारे सांगू का ? ” गुरुजी बोलले—“ तसे करू नको. त्यामुळे तो सुधारणार नाही, जास्त चिडेल. मग दोघातील द्वेष वाढेल. दोघानाहि सुधारणे हा आपला उद्देश आहे. त्या दिवशी त्या वेळेला आपण त्या ठिकाणाच्या आसपास फिरत राहू; आणि आयत्या वेळी पिला-

जीला सोडवू." मुलाना गुरुजीची युक्ति आवडली. एक मुलगा म्हणाला–“ आपण सुद्धा काठ्या व घोंगड्या घेऊन जाऊ." गुरुजीनी सांगितले–“ तसे करण्याची जरूरी नाही. आपणाला काही छपवायचे नाही. मग घोंगड्या कशाला ? चार पाच जणाच्याजवळ काठ्या असाव्यात. त्याचा कदाचित् उपयोग होईल." गुरुजीनी सर्वांना बजावले की हा बेत अगदी गुप्त ठेवा.

ठरलेल्या दिवशी पिलाजी संध्याकाळी आपल्या शेताकडे निघाला. त्याच्याबरोबर त्याचा धाकटा भाऊ होता. मळईत रामराव होतेच. ते तिघे झाडाखाली शेंगा खात बसले. अंधार पडण्याच्या वेळी त्यानी आपली शेरडे व गाय घेतली आणि गावाचा रस्ता धरला. नदीत जनावरे पाणी पिऊ लागली. रामरावानी हातपाय धुतले आणि “ जय विठ्ठला " म्हटले. पाय न भिजविता दगडावरून जाण्यासाठी पिलाजी जरा वरच्या बाजूस गेला.

इतक्यात शेजारच्या ओघळीतून चारपाच घोंगडीवाले काठ्या घेऊन धावत आले. त्यानी पिलाजीवर हल्ला केला. त्याचा बाप व भाऊ मोठ्याने ओरडले. त्याचक्षणीं उंचवट्यावरून गुरुजीनी जोरात उत्तर दिले—“ आलो हो आलो; घाबरू नका. " ते ऐकून घोंगडीवाले पळाले. गुरुजी व आठदहा मुले तेथे आली. पिलाजीला चारपाच काठ्या जोराने लागून तो खाली पडला होता. रामरावानी त्याला मांडीवर घेतला. गुरुजीनी त्याच्या

टाळूला व डोळ्याला पाणी लावले. दोन मुलाना जवळून गाडी आणण्यास त्यानी पाठविले. थोड्या वेळाने पिलाजी सावध झाला, कण्हू लागला. तो वडिलाना म्हणाला—" दाजी, पाणी द्या. गुरुजी तुम्ही मला वाचविले. " गुरुजीनी त्याला थोडे पाणी पाजले. मग ते पिलाजीच्या अंगावरून हात फिरवीत म्हणाले– " हे बघा, पिलाजीराव, स्वस्थ पडून रहा. काही बोलू नका आता. उद्या तुम्हाला चांगले बरे वाटेल; मग बोला पुष्कळ. मी येईन गप्पा मारायला. "

मुलानी गाडी आणली. तिजमध्ये पिलाजीला त्यानी निजविले. रामराव व गुरुजी पिलाजीच्याजवळ बसले. सारेजण थोड्या वेळाने घरी आले.

७

रात्री पिलाजीचे अंग रामराव व गुरुजी यानी शेकले. वैद्याकडून त्याची तपासणी करून घेतली. कोठे जखम नव्हती; काठ्यांचा मार बसला होता. वैद्यानें त्याला औषध दिले; अंगाला चोळण्यास तेल दिले. पिलाजीचे काही मित्र, गुरुजी व मुले औषधपाण्यासाठी मनापासून झटत होते. शेकण्यामुळे पिलाजीला बरे वाटले. गरम दूध घेऊन तो निजला. त्याला झोप लागलीसे पाहून गुरुजी व मुले घरी गेली. रात्री एक दोनदा पिलाजी दचकून उठला. रामराव व त्याची आई यानी त्याला सावध केले. मग त्याला सकाळपर्यंत चांगली झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुजी, दोन मुले व वैद्य पिलाजीच्या घरी आले. पिलाजीला आता बरीच हुषारी वाटू लागली. ऊन ऊन दूध व खीर त्याने घेतली. पुन्हा त्याचे अंग तेलाने चोळून मुलानी शेकले. अशा रीतीने चारपाच दिवस औषधपाणी झाल्यावर पिलाजीला बरे वाटू लागले. त्याला तितकी विश्रांति मिळली. घरी आईला त्याने हळू हळू त्या घोंगडीवाल्याची गोष्ट सांगितली. "गुरुजी आयत्या वेळेला धावले म्हणून बरे झाले; थोडक्यावर भागले; नाही तर खूनच पडायचा; गुरुजीनी वाचविले."

पुढच्या रविवारी दुपारी गुरुजी व रामराव पिलाजीच्या

शेजारी बसले. पिलाजी आता पहिल्यासारखा तरतरीत झाला होता. बोलता बोलता पिलाजीने विचारले—" कोण होते, हो, ते घोंगडीवाले ? " रामराव म्हणाले—" अरे, असावयाचे जवळचेच कोणी तरी. लांबचे लोक कशाला येतात इकडे ! " गुरुजींनी विचारले—" तुमचे पाकीट, घड्याळ घेण्याचा त्यानी प्रयत्न केला का ? " पिलाजीने सांगितले—" नाही; त्यानी काहीच घेतले नाही. नुसत्या काठ्या मारल्या. " रामराव कळवळून बोलले—" माझे म्हाताऱ्याचे ऐक बाबा. आपले शेजारीच तुझ्या वाईटावर आहेत. त्यानी मला का नाही मारले ? साऱ्याशी गोड बोलाव पिलू. कोणावर ओरडू नये, माजुरीपणा दाखवू नये. का गुरुजी माझे सांगणे खरे आहे का नाही ? "

गुरुजी—" पिलाजीराव, मला सुद्धा असेच वाटते की ते घोंगडीवाले लांबचे चोर नसावेत. आणि त्यानी तुम्हाला एकट्याला मारले. या गोष्टी वरून दाजीबांचे बोलणे खरे असावे. माझ्या कानावर तेच आले होते. तुम्हाला मारण्याच्या कटाची बातमी मुलानी मला सांगितली होती. म्हणून तर आम्ही वेळेला त्या ठिकाणी आलो. "

पिलाजी—" तुम्हाला आधी त्या कटाची बातमी कळली होती ? "

गुरुजी—" होय; शाळा सुटल्यावर आम्ही लगेच तुमच्या मळईकडे निघालो. जरा आधी आलो असतो तर इतका मार तुम्हाला बसला नसता. "

पिलाजी—" तुम्ही नदीवर आला म्हणूनच मी वाचलो. तुमचे मोठे उपकार झाले."

गुरुजी—" तसे काही म्हणू नका पिलाजीराव. पण तुमच्याबद्दल काही गावकरी चिडून का बोलतात याचा विचार केला पाहिजे. झाले ते झाले. पुढे तरी असे होणार नाही म्हणून काळजी घेतली पाहिजे."

पिलाजी—" काय काळजी घेऊ? तुम्ही सांगाल तसे वागेन. परवा त्या परदेशी हलवायाशी बाचाबाच झाली.

गुरुजी—" आणि त्या माळणीची केळी तुम्ही घेतली; तिला चार आणेच दिले, तिचे तीन आणे बुडविले."

पिलाजी—" बरे; देऊन टाकू तिचे तीन आणे. त्यात काय मोठेसे!"

गुरुजी—" मोठेसे काही नसते. पण या बारीक सारीक गोष्टीनीच लोक चिडतात. त्या दिवशी आडावर बायकांच्या पुढे जाऊन तुम्ही ओरडला. त्या बायका पळून गेल्या. त्यांच्या माणसाना राग आला नसेल का? शिवाय भाऊबंदांच्या जागेवर दडपून तुम्ही मांडव घातला. ते तुम्हावर रागावले असतीलच.

पिलाजी—" ते सुद्धा खरच गुरुजी. आई व दाजी त्याबद्दल मला बोलले होते."

गुरुजी—" बघा; म्हातारी माणसे कशी खरी गोष्ट सांगतात! त्यांचे तुम्ही ऐकले पाहिजे. शांतपणाने व विचाराने वागले पाहिजे. आपणाला जसा हक्क आहे, तसा लोकानाही

हक्क आहे—हे लक्षात घेतले पाहिजे. कोणावरहि अन्याय करू नये. अशा रीतीने वागले की काही बिघडत नाही. आमच्या मुलाना हे सारे नागरिकशास्त्रात आम्ही शिकवितो."

पिलाजी—"बरोबर; म्हणूनच तुमची मुले शिस्तीने बोलतात, शिस्तीने वागतात."

गुरुजी—"तुमची सुद्धा लष्करी शिस्त असते. पण अधिकाऱ्याच्या समोर तुमची शिस्त दिसते. आमची शिस्त प्रत्येकाने विचाराने व आपल्या मनाने राखावयाची असते. समाजात कसे वागावे, माणुसकी कशी राखावी, शेजारधर्म कसा पाळावा—हे सर्व आमच्या नागरिकशास्त्रावरून समजते."

पिलाजी—"आम्हाला कोणी असे शिकविले नाही. गुरुजी, तुम्ही मला नागरिकशास्त्र शिकवा. तुमच्या शाळेत मी येईन."

गुरुजी—"ठीक आहे. नागरिकशास्त्राचे नियम समजून सांगण्यासाठी आम्ही चित्रे काढून ठेवली आहेत. ती तुम्हाला मी दाखवीन. येत्या शनिवारी मी तुम्हाला शाळेत नेण्यास येईन."

पिलाजी—"बरे, गुरुजी. तुमच्या सांगण्याप्रमाणे मी वागेन."

रामरावाच्या डोळ्यास पाणी आले. पिलाजीची आई व बायको माजघरात बसल्या होत्या. त्यांच्या डोळ्यास पाणी आले. रामराव म्हणाले—"असा शहाणा हो, बाबा. गुरुजींचे ऐकून घे. गुरुजी म्हणजे देवमाणूस आहे."

८

ठरल्याप्रमाणे गुरुजीनी पिलाजीला शनिवारी शाळेत नेले. त्याचे स्वागत करण्यास शाळेचे बालवीर तयार होते. ढोल व पिपाण्या झांजा व वाजविणारी मुले तयार होती. लष्करी शिस्तीप्रमाणे त्या मुलांची शिस्त त्याला नमुनेदार वाटली. मग वर्गात गुरुजीनी त्याला फिरविले. चित्रे, नकाशे, नमुने जागोजागी त्याला दिसले. त्यांचा अर्थ व उपयोग गुरुजीनी समजून सांगितला. शेवटी नागरिकशास्त्राचे सारे नियम त्यानी पिलाजीला समजून दिले. सातवीच्या वर्गात सर्वांना दिसतील असे सुंदर देखावे व तक्ते लावले होते. त्यापैकी काहींचे मथळे शेवटी दाखविले आहेत. ते पाहण्यात पिलाजीला मोठी मौज वाटली.

---

१. निर्मळ अंग, सुखाचा रंग.
   शरीराची स्वच्छता राखण्याचा पहिला नियम. त्यामध्ये दात घासण्यासून सर्व गोष्टी कशा येतात ते दिसते.

२. निर्मळ कपडा, सुखाचा वाडा.
   प्रत्येकाने आपले कपडे स्वच्छ ठेवले पाहिजेत. त्यापासून त्याला आरोग्य व सुख लाभते.

३. गोड बोला, सुखाने डोला.

आरंभापासून गोड बोलण्याची सवय प्रत्येकाला लागली पाहिजे. म्हणजे सर्वांना जास्त सुखाचा अनुभव येईल.

४. प्रेमाने प्रेम वाढते.

प्रत्येकाने आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करावयाचे ठरविले पाहिजे; म्हणजे त्यावर शेजारी प्रेम करील; अशा रीतीने सर्व समाजात प्रेमाचे राज्य नांदू लागेल.

५. मानाने मान वाढतो.


प्रत्येकाने दुसऱ्याला मान दिला पाहिजे; म्हणजे दुसराहि त्याला मान देईल. अशा रीतीने सर्व समाजात सभ्यतेचे साम्राज्य नांदू लागेल.

६. विश्वासाने विश्वास वाढतो.

प्रत्येकाने शेजाऱ्यावर विश्वास ठेवला पाहिजे व विश्वास ठेवण्यास आपण योग्य आहोत अशा खरेपणाने वागले पाहिजे. विश्वासूपणात खरी माणुसकी आहे.

७. पुण्य तो परोपकार, पाप ती परपीडा.

दुसऱ्यावर उपकार करणे हे खरे पुण्य; दुसऱ्याला त्रास देणे हेच खरे पाप. हे लक्षात ठेवून प्रत्येकाने वागले पाहिजे.



दुःखितास मदत
गाव करी ते राव न करी
परोपकार हेच पुण्य
गावाचे धरण
पराडकर

८. खरा व्यवहार, सुखाचा संसार.

सर्व देवघेव, बोलणे, चालणे, धंदा करणे यात प्रत्येकाने खरेपणाने वागले पाहिजे. एकाने लबाडी केली की इतराना लबाडी करण्याची फूस मिळते; मग सारा समाज म्हणजे चोरांचा बाजार बनतो. अशा समाजात कोणालाहि सुख मिळत नाही. म्हणून सर्व कामात खरेपणा दिसला पाहिजे.

९. गाव करील ते राव करणार नाही.

लोकानी सहकार्याने, एकजुटीने वागावयाचे ठरविले तर मोठमोठी कामे थोडक्या खर्चात व सहज होतात.

१०. अहंकाराला मार व विनयाचा विजय.

प्रत्येकाने विनयाने वागले पाहिजे. गर्वाने किंवा अहंकाराने वागण्यात काही सुख, गोडी नसते. आपणासारखेच दुसऱ्याला हक्क आहेत—हे ओळखून प्रत्येकाने वागले पाहिजे.

समाजशिक्षणास उपयुक्त पुस्तकें

			किंमत
१	आपलें नागरिकशास्त्र	प्रा. वि. पां. बोकील	१–८–०
२	शिक्षकांचें नागरिकशास्त्र	,,	२–८–०
३	मुलांचें नागरिकशास्त्र ७ वें	,,	०–८–०
४	मुलांचें नागरिकशास्त्र ६ वें	,,	०–८–०
५	मुलांचें नागरिकशास्त्र ५ वें	,,	०–८–०
६	मुलांचें नागरिकशास्त्र ४ थें	,,	०–८–०
७	मुलांचें नागरिकशास्त्र ३ रें	,,	०–७–०
८	मुलांचें नागरिकशास्त्र २ रें	,,	०–६–०
९	मुलांचें नागरिकशास्त्र १ लें	,,	०–४–०
१०	जळगावची जत्रा	प्रा. वि. पां. बोकील व श्री. ल. रं. रड्डी	०–२–०
११	पिलाजी पलटणवाला	,,	०–८–०
१२	कुळधर्माची कथा	,,	०–८–०